संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

# स्वातंत्र्याचा मानभंग न करणारे मानदंड हवेत

स्वातंत्र्य म्हणजे काय तर निसर्गत: जगण्याची एक वैशिष्ट्यपूर्ण अनुभूती. स्वतंत्रता किंवा स्वातंत्र्य हा एक निसर्गनियम आहे. ती एक नैसर्गिक प्रवृत्ती आहे. ती कोणीही दडपून टाकू शकत नाही. आणि सृष्टीमध्येच काय जगात मानवी इतिहासामध्ये जेव्हा जेव्हा मनुष्याचे हे स्वातंत्र्य दडपण्याचा प्रयत्न झाला त्या त्यावेळी तो उधळून लावण्यातही मनुष्य यशस्वी झालेला दिसून येतो. आतापर्यंत जगात लढले गेलेले स्वातंत्र्यलढे ही मानवी मनाच्या याच स्वतंत्र अनुभूतीचा जिवंत साक्षात्कार होते. भारतात इंग्रजांची तब्बल दीडशे वर्षांची जुलमी राजवट उधळून लावण्याचा लढा हासुध्दा याच मानवी स्वातंत्र्याच्या अनुभूतीचा एक देदीप्यमान साक्षात्कार म्हणता येईल. जगातले अनेक देश याच निसर्गत: असलेल्या स्वातंत्र्याच्या प्राप्तीकरता लढले. आणि यशस्वी झाले. भारताने मात्र प्रदीर्घ काळ कमीत कमी अहिंसक वृत्तीचा मार्ग अवलंबून स्वातंत्र्य मिळवण्याचा प्रयत्न केला. म्हणून त्याला हे स्वातंत्र्य मिळवण्यासाठी प्रदीर्घ काळ लागला. हिंसाचार आणि रक्तपाताचा अतिरेकी मार्ग स्वीकारला असता तर कदाचित हे स्वातंत्र्य आणखी लवकर मिळाले असते. परंतु त्याचे काही परिणामही शिल्लक राहिले असते. याचा अर्थ पूर्णपणे रक्तपाताशिवाय भारताला स्वातंत्र्य मिळाले असे म्हणता येत नाही. अनेक क्रांतिकारकांचे हौतात्म्य म्हणजे त्यांच्या रक्ताच्या सिंचनातून स्वातंत्र्याचे लढे अधिक प्रखर झाले.आज अशा दिव्य बलिदानातून मिळालेल्या स्वातंत्र्याचा ६८ वा स्वातंत्र्यदिन साजरा करत आहोत. देशभर ठिकठिकाणी होणारे ध्वजवंदन हे त्याचे प्रतिकरुप जरी असले तरी आजच्या या पवित्र दिवशी ध्वजवंदनाबरोबर तितकेच कठोर सिंहावलोकनही करण्याची गरज आहे. स्वातंत्र्य आपल्याला कसे मिळाले ते स्वातंत्र्य जपण्याचा काय प्रयत्न केला आणि या स्वातंत्र्याचे सुराज्यात रूपांतर करण्यासाठी आपण काय करत आहोत अशा काही प्रश्नांची उत्तरे अगदी सामान्य जनतेने आणि या देशातल्या राजकारण करणाऱ्या वर्गाने शोधली पाहिजे. ६८ वर्षांचा प्रवास अगदीच वाईट नाही; परंतु समाधानकारक आहे असेही म्हणता येत नाही. ज्यावेळी देशाच्या प्रगतीचे वेगवेगळे मापदंड आपण लावतो तेव्हा स्वातंत्र्याच्या या पडद्यावर दिसणारे चित्र अजूनही अपुरे आणि अधुरे वाटायला लागते. कारण या मापदंडांसाठी काही मानदंडही आवश्यक होते ते स्वीकारण्याची तयारी गेल्या अडुसष्ट वर्षांतल्या सत्ताधाऱ्यांनी दाखवली नाही म्हणूनच एका तेजपुंज स्वातंत्र्यलढ्याचा आपल्याकडून मानभंग होतो आहे की, काय असे वाटल्याशिवाय राहात नाही.

### सत्तेचाच अखंड हव्यास

व्यक्ती असो किंवा राष्ट्र असो. स्वातंत्र्य हे त्याचे जीवनमूल्य राहिले पाहिजे. जे विकास किंवा प्रगतीकडे घेऊन जाण्यासाठी अत्यंत उपयोगी पडते. वयोमानानुसार वाढत जाणारी व्यक्ती बौध्दिक आणि कर्तृत्वाच्यादृष्टीने विकसित होत जाते. वयाबरोबर जर बुध्दी आणि कर्तृत्व शून्य राहील तर मात्र त्या वयोमानाचा आपल्याकडूनच अपमान झाल्याचे शल्य मनामध्ये राहते. एवढे सुंदर मानवी आयुष्य मिळाले, पण आपण त्याचा बुध्दी आणि कौशल्यातून मान ठेवत नाही हीच परिस्थिती एखाद्या राष्ट्राच्या जीवनाबाबत लागू पडते. अत्यंत कष्टाने मिळालेले स्वातंत्र्य आपण कसे जपले कसे वाढवले किंबहुना ते कसे विकसित केले यावर त्या राष्ट्राचे चारित्र्य अवलंबून असते. आज ६८ वर्षांनंतर भारताने जगामध्ये स्वत:चे एक स्थान निर्माण केले आहे. परंतु अजूनही पूर्ण विकसित प्रबळ किंवा शक्तिशाली राष्ट्र म्हणून मान मिळालेला नाही.स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच हा कालावधी तुलनेने छोटा असला तरी अगदीच कमी नाही. या काळाचा जर अधिक कौशल्याने आणि अधिक राष्ट्रसमर्पित युक्तीने उपयोग झाला असता तर भारताला एक विकसित आणि शक्तिशाली राष्ट्र म्हणून निदान चीनइतकाच मान मिळू शकला असता. दुर्दैवाने स्वातंत्र्यानंतर आपल्याला एका सुराज्याची निर्मिती करायची आहे याचा आपल्या नेत्यांना विसर पडला.आणि अडुसष्ट वर्षांमध्ये केवळ सत्ताराजाच उपभोग घेतला गेला आहे. अमेरिकेतून प्रसिध्द होणाऱ्या 'फोर्ब्ज' मासिकात जगातल्या श्रीमंतांची यादी प्रसिध्द होते. त्यात भारतातल्या दहाजणांचा समावेश असतो. सव्वाशे कोटीच्या देशामध्ये या दहा श्रीमंतांची नावे येणे यात काही विशेष नाही. कारण त्याचवेळी याच भारतामध्ये साठ कोटी लोक दारिद्र्यरेषेखाली राहात असतात.ही वस्तुस्थिती लपून राहत नाही. मग मिळालेल्या स्वातंत्र्याचा आपण सुराज्यासाठी वापर केला नाही.हे वेगळे सांगण्याची गरज उरत नाही. अगदी आज ६८वर्षीदेखील हीच परिस्थिती अनुभवयाला येते.मिळालेल्या स्वातंत्र्याचा मानभंग होऊ नये आणि जगात देशाचा सन्मान वाढावा यासाठी तशी इच्छाशक्ती दिसून येत नाही. या मार्गात दोनच प्रमुख अडथळे दिसून येतात.ते म्हणजे प्रखर राष्ट्रीयत्वाचा अभाव आणि भ्रष्टाचारासाठी लालचावलेली वृत्ती त्याला कारणीभूत ठरते.

### हा स्वातंत्र्याचा विश्वासघात

भारत हा प्राचीन काळापासून ते आजपर्यंत कृषिप्रधान देश म्हणूनच ओळखला जातो. परंतु याच कृषिप्रधान देशात दरवर्षी दहा हजार शेतकरी आत्महत्या करत असतील तर आपला प्रवास हा योग्य दिशेने चाललेला नाही यावर शिक्कामोर्तब होते. आज भारतामध्ये लोकशाही प्रधान व्यवस्था आहे. परंतु मतदानापुरता लोकांचा सहभाग असलेली ही व्यवस्था सामान्य माणसाच्या विकासाला हातभार लावू शकलेली नाही.इथे स्वातंत्र्यदिनाचा जेवढा महोत्सव होत नाही तेवढा निवडणुकांचा उत्सव धूमधडाक्यात साजरा होतो म्हणजेच स्वातंत्र्याचे मूल्यच लक्षात घेतले जात नाही. ज्याच्यामुळे सत्तेचा खेळ मांडला जातो. त्या स्वातंत्र्याचे भानसुध्दा राखले जात नाही. कुठेतरी या गोष्टीचा गंभीरपणे विचार झाला पाहिजे. सामान्य माणसाची नोकरी असो व्यवसाय असो किंवा बड्या लोकांचे उद्योग किंवा राजकारण्यांची सत्ताप्राप्ती असते.या सर्वांनी स्वातंत्र्याची जाणीव ठेवून आपला कारभार चालू केला तर आपोआपच राष्ट्रीय चारित्र्याची निर्मिती होईल. भ्रष्टाचार, गैरव्यवहार किंवा कोणत्याही प्रकारचा अत्याचार या गोष्टी स्वातंत्र्याचा विश्वासघात करणाऱ्या आहेत.याची जाणीव ठेवली गेली पाहिजे किंवा त्याचे स्मरण करून दिले पाहिजे. आज भारतीय स्वातंत्र्य चिरायू होवो अशा शुभेच्छा देत असताना या स्वातंत्र्याचा मानभंग होणार नाही अशा मानदंडाचीही निर्मिती झाली पाहिजे.